# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.३१/१२/१७
## दि.३०/१२/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३०८/१७,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | गोपाळ परदेशी,पो.हवा. खडकी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | दिपक मनुप्रसाद मिश्रा,वय-२६,रा.रेल्वे पोलीस लाईन,औंध रोड,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१२/२०१७ रोजी २३/०० वा. ॲम्युनेशन फॅक्ट्री गेटचे रेल्वे पटरी लगत खडकी,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद मयत इसम दिपक मनुप्रसाद मिश्रा,वय-२६,रा.रेल्वे पोलीस लाईन,औंध रोड,पुणे याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी स्वतः मोटार सायकलवरून ॲम्युनेशन फॅक्ट्री गेटचे रेल्वे पटरीवर स्लीप होवुन,त्यामध्ये तो गंभीर जखमी होवुन,त्याचेवर दवाखान्यात उपचार चालु असताना,उपचारा दरम्यान दि.३०/१२/१७ रोजी रात्रौ ००/३० वा. तो स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शिंदे ९८२३३९३७२१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४७३/१७,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | सुभाष कुंडलकर,वय-६८ वर्षे,रा.सदाशिव पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/१२/२०१७ १४/०० वा. ते दि.३०/१२/२०१७ रोजी २०/०० वा. चे दरम्यान फ्लॅट नं.६ पिनॅक सुमनश्री फ्लॅट नं.१,स.नं.१,कर्वेनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे लोखंडी व लाकडी दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन, त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख रक्कम ३५,०००/- व सोन्याचे दागिने असा एकुण २२५,०००/- रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.एन.धावडे ९९२२२६१४६९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ४०५/१७,भादविक ४२०,४६८,४७१,१९८,१९९,२०० |
| **फिर्यादी** | बी.डी.वाघ, पो.हवा. शिवाजीनगर पोलिस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | इक्बाल करीम शेख,रा.स.पं.७९,विकास पगर,घोरपडी गाव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/१२/२०१७ ते दि.३०/१२/२०१७ रोजीचे १७/०० वा. मा.शिवाजीनगर न्यायालय, शिवाजी नगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हा मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकरी सो।.शिवाजीनगर कोर्ट नं.२,पुणे शहर येथे वेग-वेगळया इसमांना जामीनदार म्हणुन राहुन त्यांचेकडुन योग्य तो मोबदला घेवुन रेशन कार्डाचे बनावटीकरण करुन,मा.न्यायालया मध्ये खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून न्यायालयाची फसवणुक करीत असताना मिळुन आला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डि.एस.शिंदे ८१४९३६४१४१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ४८९/१७,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | स्मिता जितुरी,वय-६० वर्षे,रा.मुकुंदनगर,स्वारगेट पुणे |
| **आरोपी** | एक इसम व दोन महिला,रा.पौडरोड कोथरुड,पुणे (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२००८ रोजी ते दि.०२/०६/२००८ रोजी दु.१२/१२ वा.चे कालावधीत डॉ.चैतन्य कॉर्ड लाईफ बायोटेक,पीएल-१०३,सुदर्शन अपार्टमेंट,२१,शिला विहार कॉलनी,पौड रोड कोथरुड,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम व महिला यांनी डॉ.चैतन्य कॉर्ड लाईफ बायोटेक,पीएल-१०३,सुदर्शन अपार्टमेंट,२१,शिला विहार कॉलनी,पौड रोड कोथरुड,पुणे येथे फिर्यादी यांची मुलीचे डिलव्हरीचे पुर्वी व त्यानंतर डिलेव्हरीचे वेऴेस पाटणकर नर्सीग होम,स्वारगेट पुणे येथे ॲडमीट झाली असताना,त्यांनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,तीचे बाऴाच्या नाऴेतील रक्त स्टेरेज करुन ठेवतो,त्यामुऴे बाऴाला होणा-या आजारापासुन संरक्षण मिऴेल असे सांगुन फिर्यादी यांचेकडुन एकुण ६५,०००/- रुपये घेतले. त्यानंतर फिर्यादी यांनी सदर बाबत चौकशी केली असता,सदर इसम व महिलांनी आपसात संगनमत करून,सदरचे ऑफिस बंद करुन,फिर्यादी यांचेशी संपर्क मोडुन त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) शंकर खटके ७५८८२३५८४४ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ५७२/१७,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | सौ.जुई देशमुख,वय-२८,रा.बावधन,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/१२/१७ रोजी ०८/३० वा. अनंत शिल्प सोसायटी,बावधन,हिंजवडी,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांचे बँकेच्या क्रेडिट कार्डचा डिजीट नंबर,सीव्हीव्ही नंबर, वन टाईम पासवर्ड नंबर चोरुन, ऑनलाईन माध्यमाव्दारे ५८,२८७/- रुची खरेदी करुन, फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (फिर्यादी व त्यांचे पतीची तब्येत ठीक नसल्याने ते ठिक झाल्यानंतर त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एन.एस.न्यामणे |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ९७९/१७,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | अलिझा पारु,वय-२४ वर्षे,रा.शांती रक्षक सोसायटी,शास्रीनगर,येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात बँकेचा खातेधारक व मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/१२/२०१७ रोजी ०५/१५ ते ०५/२७ वा.चे दरम्यान शास्त्रीनगर,येरवडा,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे खराडी शाखा येथील बॅकेच्या सॅलेरी खात्याचे डेबीट कार्ड हे त्यांचे ताब्यात असताना,फिर्यादी यांना मोबाईलवर नमुद वेळी बॅकेकडुन पाच मॅसेज आले. त्यामध्ये त्यांचे खात्यावरील डेबीट कार्डावरुन कोणीतरी अज्ञात बँकेचा खातेधारक व मोबाईलधारक व्यक्तींनी एकुण ११,८२९/- रुपयेची खरेदी झाली असल्याचे,तसेच फिर्यादी यांचे ई-मेल आयडीवर सुद्धा सदर ट्रान्झेक्शन झाल्याचे दिसुन आले. सदरचे ट्रान्झेक्शन हे पेटीएमवर झाले असल्याचे समजले. तरी फिर्यादी यांचे बँकचे पगाराचा खात्याचे डेबीट कार्ड त्यांचेजवळ असताना मोबाईलवरील पेटीएम सीमकार्ड धारकाने व बँकेचे खातेधारकाने फिर्यादी यांची ११,८२९/- रक्कम रुपये ऑनलाईन माध्यमाव्दारे ट्रान्झेक्शन करुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अशोक कदम ८८८८१२०३३३ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ५०३/१७,भादविक ३०९,आर्म ॲक्ट ४,२५,महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७ (१)सह १३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | महेंद्र रानगट,पोलीस शिपाई, खडक पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपी** | फैजल उर्फ सोन्या रफिक नदाफ,रा.५४/एचपी लोहियानगर पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/१२/२०१७ रोजी रात्रौ २२/३० वा. ५४/एचपी,लोहियानगर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी खडक पोलीस ठाणेच्या अभिलेखावरील इसम फैजल उर्फ सोन्या रफिक नदाफ हा हातामध्ये कोयत्यासारखे हत्यार घेवुन तो हवेत फिरवुन सदर भागात दहशत निर्माण करीत असल्याने,फिर्यादी हे त्यास पकडणेसाठी त्याचे जवळ गेले असता,त्याने स्वतःकडील माचीसचे सहाय्याने स्वतःस पेटवुन घेवुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस. टेमगिर ९५५२५५२४१८ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ५२७/१७,भादविक ३५३,३४ |
| **फिर्यादी** | पो.शि. कांबळे, स्वारगेट वाहतुक विभाग पुणे शहर |
| **आरोपी** | १.वसिम रफिक शेख,वय-२३,रा.आंबेडकर नगर,मार्केटयार्ड,पुणे (अटक) व इतर तीन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/१२/१७ रोजी २०/०० वा. हमाल पंचायत शाळे समोर मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी ३१ डिसेंबर निमित्त ड्रंक ॲण्ड ड्राईव्हची कारवाई करीत असताना,यातील नमुद इसमांनी त्यांचे मोटार सायकलवर ट्रिपल सिट बसुन चालवित येत असताना,फिर्यादी यांनी त्यांना थांबविले असता,सदर इसमांनी त्याचा राग मनात धरून, फिर्यादी यांना धक्क-बुक्की करून,त्यांचे सरकारी गणवेशाला हात लावुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. होनराव ९९२३०८५५६२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**